
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



• वर्ष : ०४ • अंक : ०५७ • पुणे • शनिवार, दि. ०७ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

लोहगाव बसस्थानक चोरीला

- **बसशेडला बेकायदेशीर वाहनांचा विळखा; प्रवाशांना बाराही महिने रस्त्यावरच प्रतीक्षा**
- **लाखो रुपये खर्चून उभारलेल्या बसशेडचा वाहनतळ म्हणून वापर**
- **महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांची प्रचंड गैरसोय, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांमध्ये संतापाची लाट**

पुणे : निरंजन (सोमनाथ) साळुंके (दै. आरंभ पर्व)

श्री क्षेत्र लोहगाव येथील प्रवाशांच्या सोयीसाठी लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेले बसस्थानक सध्या प्रवाशांसाठी आहे की बेकायदेशीर वाहनतळासाठी, असा संतप्त सवाल लोहगावकर उपस्थित करत आहेत. बसस्थानकाला बेकायदेशीरपणे पार्क केलेल्या वाहनांचा विळखा पडल्याने प्रवाशांना बसशेडमध्ये उभे राहण्याचीही जागा उरलेली नाही. परिणामी, बसस्थानक असूनही प्रवाशांना भर उन्हात, पावसात आणि धुळीत रस्त्यावर उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. बसस्थानकाचे अस्तित्वच वाहनांच्या अतिक्रमणाखाली हरवले असल्याने 'लोहगावचे बसस्थानक गेले चोरीला!' अशी उपरोधिक चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, गेल्या अनेक वर्षांपासून ही परिस्थिती कायम असतानाही संबंधित प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आणि संताप व्यक्त होत आहे.

पुणे शहरापासून अवघ्या दहा ते पंधरा किलोमीटर अंतरावर असलेल्या लोहगाव परिसराने गेल्या काही वर्षांत झपाट्याने शहरीकरणाचा वेग पकडला आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ, मोठ्या प्रमाणावर विस्तारलेल्या खासगी शैक्षणिक संस्था, वाढत्या निवासी सोसायट्या आणि रोजगाराच्या संधी यामुळे या भागात लोकसंख्येचा मोठा विस्तार झाला आहे. राज्याच्या विविध भागांतून तसेच परराज्यांतून रोजगार आणि शिक्षणाच्या निमित्ताने हजारो नागरिक लोहगाव परिसरात वास्तव्यास आले आहेत. त्यामुळे दररोज पुणे शहरात नोकरी, व्यवसाय आणि शिक्षणासाठी ये-जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या प्रवाशांच्या सोयीसाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) वतीने काम्रज, स्वारगेट, पुणे स्टेशन आदी महत्त्वाच्या ठिकाणांहून लोहगावसाठी बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या माध्यमातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. प्रवाशांच्या माध्यमातून परिवहन महामंडळाला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत असताना, त्याच प्रवाशांना मूलभूत सुविधांसाठी मात्र संघर्ष करावा लागत असल्याचे विदारक चित्र येथे पाहायला मिळत आहे.

प्रवाशांचा उन्हापासून आणि पावसापासून बचाव व्हावा, त्यांना बसची प्रतीक्षा करताना सुरक्षित निवारा मिळावा, या उद्देशाने लाखो रुपये खर्च करून बसशेड उभारण्यात आले. मात्र, या बसशेडचा प्रत्यक्ष वापर प्रवाशांऐवजी बेकायदेशीरपणे वाहने उभी करणारे वाहनचालक करत असल्याचे चित्र आहे. बसशेडसमोरील संपूर्ण परिसरात वाहनांचा विळखा पडल्याने प्रवाशांना बसशेडमध्ये प्रवेश करणेही कठीण झाले आहे. त्यामुळे बसस्थानकाचे रूपांतर वाहनतळात झाले आहे की काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

प्रवाशांसाठी उभारलेल्या शेडमध्येच वाहनांनी कब्जा केल्याने महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांना रस्त्यावर उभे राहून बसची वाट पाहावी लागते. उन्हाळ्यात कडक उन्हाचा मारा आणि पावसाळ्यात पावसाच्या सरी अंगावर झेलत प्रवासाची प्रतीक्षा करण्याची वेळ प्रवाशांवर येत आहे. लाखो रुपये खर्चून सुविधा उभारायच्या आणि त्याचा लाभ मात्र प्रवाशांना मिळू द्यायचा नाही, ही बाब संतापजनक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. शहरातून येणाऱ्या पीएमपीएमएलच्या बसेस उभ्या करण्यासाठी पुरेशी पार्किंग किंवा स्वतंत्र थांब्याची व्यवस्था नसल्याने बसचालकांना रस्त्यावरच बसेस उभ्या कराव्या लागत आहेत. यामुळे धानोरी, वाघोली तसेच परिसरातील अन्य मार्गांवर जाणाऱ्या वाहनांची वाहतूक कोंडी होत आहे. आधीच अरुंद आणि वर्दळीच्या रस्त्यावर बस, खासगी वाहने आणि बेकायदेशीर पार्किंग यांचा एकत्रित ताण पडत असल्याने इतर वाहनचालकांना कोंडीतून मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. बसस्थानकाचे नियोजन आणि वाहनांसाठी स्वतंत्र व्यवस्था नसल्याचा फटका संपूर्ण परिसराला बसत आहे.

स्वच्छतागृह नाही; महिलांची कुचंबना, पुरुषांचीही गैरसोय!

बसस्थानक परिसरात सार्वजनिक स्वच्छतागृहाची कोणतीही पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः महिला प्रवाशांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. स्वच्छतागृहाअभावी महिलांची कुचंबना होत असून पुरुषांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. काही पुरुषांना नाइलाजाने उघड्या जागेचा आधार घ्यावा लागत असल्याने परिसरातील स्वच्छतेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाची ओळख असलेल्या लोहगावसारख्या परिसरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या ठिकाणी स्वच्छतागृहासारखी मूलभूत सुविधा नसणे ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



ठेकेदारांच्या बोनसची चर्चा; मग प्रवाशांच्या समस्यांचे काय?

नुकतेच पीएमपीएमएलच्या ठेकेदारांनी कामगारांना दिवाळी बोनस न दिल्याच्या कारणावरून दत्तवाडी पीएमपीएमएल डेपो येथे ठेकेदार कामगारांच्या वतीने आंदोलन करण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. कामगारांच्या प्रश्नांवर आंदोलनाची वेळ येत असताना दुसरीकडे लोहगावमधील बसस्थानकाचा प्रश्न मात्र गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. ठेकेदार, प्रशासन आणि संबंधित विभाग यांच्यातील प्रश्नांवर चर्चा होत असताना दररोज बसने प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे लक्ष देणार कोण, असा सवाल लोहगावकर विचारत आहेत.

धुळीचे लोट, प्रदूषण आणि आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर!

लोहगावमधील बसस्थानक मुख्य रस्त्यालगत असल्याने या मार्गावर दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. बसस्थानक परिसरात बेकायदेशीर वाहनांची गर्दी, रस्त्यावरून धावणारी वाहने आणि उडणारी धूळ यामुळे प्रवाशांना प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. बसची प्रतीक्षा करताना लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना धुळीचा त्रास सहन करावा लागत असून आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

बसशेडसमोर वाहने उभी करणाऱ्या काही वाहनचालकांना प्रवाशांनी जागा मोकळी करण्याबाबत सांगितल्यास त्यांच्याकडून दादागिरीची भाषा केली जात असल्याची तक्रार प्रवाशांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे आपल्या हक्काच्या बसशेडमध्ये उभे राहण्यासाठीही प्रवाशांना वाद घालण्याची वेळ येत आहे. काही वाहनचालकांच्या वर्तणुकीमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेक जण तक्रार करण्याऐवजी गप्प राहणे पसंत करत आहेत. सार्वजनिक सुविधेवर अतिक्रमण करून सामान्य नागरिकांनाच वेठीस धरण्याचा हा प्रकार कधी थांबणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार!

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांचे आजोळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे जागतिक नकाशावर स्थान मिळवलेल्या लोहगाव परिसरातील बसस्थानकाची ही दुरवस्था अत्यंत दुर्दैवी आहे. बसस्थानकात येणाऱ्या प्रवाशांची अशाच प्रकारे हेळसांड होत राहणार असेल, तर प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी. बसशेडवरील बेकायदेशीर वाहनांचे अतिक्रमण तातडीने हटवावे, प्रवाशांसाठी बसण्याची व स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करावी. तसेच बससाठी स्वतंत्र थांबा आणि पार्किंगची व्यवस्था करावी. अन्यथा प्रवाशांच्या हक्कासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा डॉ. स्वप्नील माने (पाटील), युवा अध्यक्ष, सामर्थ्य जनशक्ती संघटना यांनी दिला आहे.

प्रशासनाला थेट सवाल

प्रवाशांच्या पैशातून चालणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था प्रवाशांनाच सुविधा देऊ शकत नसेल, तर या व्यवस्थेचा उपयोग नेमका कोणासाठी? बसस्थानक प्रवाशांसाठी आहे की बेकायदेशीर वाहनतळासाठी? लोहगावकरांच्या या प्रश्नांना पीएमपीएमएल प्रशासन कधी उत्तर देणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

संघटनांच्या मागण्यांनाही प्रशासनाची केराची टोपली?

लोहगावमधील बसस्थानकाच्या या गंभीर समस्येबाबत विविध सामाजिक संघटनांच्या वतीने वेळोवेळी सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, अद्याप परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला नाही. ज्या प्रवाशांच्या माध्यमातून परिवहन व्यवस्थेला उत्पन्न मिळते, त्याच प्रवाशांना मूलभूत सुविधांसाठी झगडावे लागत आहे. पीएमपीएमएल प्रशासनातील अधिकारी या समस्येची प्रत्यक्ष पाहणी करून प्रवाशांच्या अडचणी जाणून घेणार तरी कधी, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. तक्रार करायची तरी कोणाकडे आणि न्याय मागायचा तरी कोणाकडे, अशी अवस्था प्रवाशांची झाली आहे.

ठळक बातम्या

पुण्यात गारठा वाढणार

पुणे (आरंभ पर्व) : ऑक्टोबर महिना संपून नोव्हेंबर सुरू झाला, तरी पुणेकरांना अद्याप अपेक्षित थंडीची प्रतीक्षा आहे. दिवसा उन्हाचा चटका आणि रात्री जाणवणारा हलका गारठा, असे संमिश्र वातावरण सध्या शहरात अनुभवायला मिळत आहे. मात्र, पुढील तीन ते चार दिवसांत किमान तापमानात घट होण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. त्यामुळे रात्री आणि पहाटेच्या तापमानात घट होऊन शहरातील गारठा वाढण्याची शक्यता आहे.शहर आणि परिसरात शुक्रवारी (ता. ६) दिवसभर आकाश मुख्यतः निरभ्र होते. त्यामुळे कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअसवर स्थिर राहिले, तर किमान तापमानात किंचित वाढ होऊन ते १९.१ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. दिवसा दिवसा उन्हाची तीव्रता जाणवत असली तरी, सूर्यास्तानंतर आणि पहाटेच्या वेळी हवेत काहीसा गारठा जाणवत आहे.शनिवारी (ता. ७) शहराचे कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १८ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवस आकाश निरभ्र राहणार आहे.

ओतूर पोलिसांचा दुचाकी चोरट्यांना दणका!

तीन आरोपी अटकेत; पाच लाखांच्या नऊ मोटारसायकली जप्त

ओतूर (दै. आरंभ पर्व)

ओतूर : ता.जुन्नर येथील पोलिसांनी मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावत तीन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून सुमारे पाच लाख रुपये किमतीच्या नऊ चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे ओतूरसह अकोले, संगमनेर आणि चाकण परिसरातील मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली. याबाबत अधिक माहिती अशी की ता.३१ ऑक्टोबर रोजी रात्री ११ ते १ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.१० वाजण्याच्या दरम्यान ओतूर येथील चैतन्य विद्यालयासमोरील रस्त्यावरून दत्तात्रय बाळशिराम गिते यांची डिस्कव्हर मोटारसायकल (एमएच १४ बीएच ६३६७) अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. याप्रकरणी ओतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करताना ओतूर पोलिसांच्या पथकाला ब्राह्मणवाडा-ओतूर रस्त्यावर संशयित तीन जण चोरीच्या मोटारसायकलवरून जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी संदीप गोरक्षनाथ गडख, वैभव विजय वावळे (दोघेही रा. अकोले परिसर, जि. अहिल्यानगर) आणि दीपक कुमा उंबरे (रा. मांडवे, ता. जुन्नर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे मोटारसायकलच्या कागदपत्रांची मागणी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत पळून जाण्याचा प्रयत्न केला. तपासात संबंधित मोटारसायकल चोरीची असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर तिघांना अटक करण्यात आली.

पोलिस कोठडीत अधिक चौकशी केली असता आरोपींनी त्यांचा साथीदार विशाल सुनील ठोंगीरे (रा. मुथाळणे, ता. जुन्नर) याच्या मदतीने आणखी आठ मोटारसायकली चोरल्याची कबुली दिली. या मोटारसायकली अकोले, संगमनेर, चाकण आणि ओतूर परिसरातून चोरल्याचे तपासात समोर आले. त्यानुसार पोलिसांनी एकूण नऊ मोटारसायकली जप्त केल्या आहेत. यामध्ये डिस्कव्हर, हिरो स्प्लेंडर आणि स्प्लेंडर प्लस या दुचाकींचा समावेश आहे. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार आणि जुन्नर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव, पोलीस उपनिरीक्षक आमणे तसेच पोलीस हवालदार नरेंद्र गोराणे, दिनेश साबळे, महेंद्र पाटील, बाळशिराम भवारी, धनंजय पालवे, पोलीस कॉन्स्टेबल ज्योतीराम पवार, आशिष जगताप, श्यामसुंदर जायभाये, विशाल गोडसे आणि अतुल भेके यांनी सहभाग घेतला. मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करून नऊ दुचाकी हस्तगत करण्यात ओतूर पोलिसांना यश आले असून, या कारवाईमुळे दुचाकी चोरट्यांचे धाबे दणाणले आहेत.

सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीला मोठा दणका

१० शाळांची मान्यता रद्द करण्याचे आदेश!

पुणे (दै. आरंभ पर्व)

शिक्षकांचे अनेक महिन्यांपासून वेतन थकल्याने निर्माण झालेला असंतोष, शिक्षकांनी अध्यापनावर टाकलेला बहिष्कार आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान या गंभीर बाबींची शिक्षण विभागाने दखल घेतली आहे. याच पार्श्वभूमीवर पुण्यातील सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीला मोठा दणका बसला असून, संस्थेच्या तब्बल १० शाळांची मान्यता रद्द करण्याचे आदेश पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक मच्छिंद्रनाथ कदम यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून, संस्थेच्या शाळांच्या भवितव्याबाबत तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व्यवस्थेबाबत चर्चा सुरू झाली आहे. शिक्षण विभागाच्या या कारवाईमध्ये संस्थेच्या सहा माध्यमिक आणि चार प्राथमिक शाळांचा समावेश आहे. शिक्षकांचे वेतन वेळेवर न मिळणे, त्यामुळे शिक्षकांमध्ये निर्माण झालेली नाराजी आणि त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणे, या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आल्याचे समजते. शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ असताना त्यांच्या वेतनाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहणे आणि परिणामी अध्यापन प्रक्रिया विस्कळीत होणे, ही बाब शिक्षण विभागाने गांभीर्याने घेतली आहे. शिक्षकांचे अनेक महिन्यांपासून वेतन रखडल्याने संबंधित शाळांमधील शिक्षक आर्थिक अडचणीत सापडले होते. वारंवार वेतनाची मागणी करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने शिक्षकांमध्ये असंतोष वाढत गेला. अखेर शिक्षकांनी अध्यापनावर बहिष्कार टाकण्याची भूमिका घेतली. त्यामुळे शाळांमधील नियमित शैक्षणिक कामकाजावर परिणाम झाला असून विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण होण्यास अडथळे निर्माण झाले. शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न हा केवळ संस्थेच्या अंतर्गत व्यवस्थापनापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचे गंभीर परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर होतात.



- **शिक्षकांचे वेतन थकल्याने अध्यापनावर बहिष्कार**
- **विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची गंभीर दखल**

संपादकाय
विचार आजचा... दिशा उद्याची...

दीपावली : प्रकाशाचा उत्सव की माणुसकीचा जागर?



दीपावली हा केवळ दिव्यांचा, रोषणाईचा आणि आनंदाचा सण नाही, तर तो अंधारातून प्रकाशाकडे, निराशेतून आशेकडे आणि अज्ञानातून ज्ञानाकडे जाण्याचा संदेश देणारा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वपूर्ण उत्सव आहे. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सणाने भारतीय समाजजीवनाला आनंद, उत्साह, एकोप्याची आणि नवचैतन्याची अनुभूती दिली आहे. मात्र, बदलत्या काळात दीपावली साजरी करण्याच्या पद्धती बदलत असताना या सणामागील मूळ विचार आपण जपतो आहोत का, हा विचार करण्याची वेळ आली आहे.

दीपावली म्हणजे अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अन्यायावर न्यायाचा विजय. प्रभू श्रीरामांच्या अयोध्या आगमनाच्या स्मृतीशी जोडलेला हा उत्सव भारतीय जनमानसात आनंदाचे प्रतीक बनला आहे. घराघरांत लावले जाणारे पणतीचे दिवे केवळ घर उजळवत नाहीत, तर मनातील आशा आणि सकारात्मकतेची ज्योतही प्रज्वलित करतात. म्हणूनच दीपावलीचा खरा अर्थ केवळ बाह्य सजावटीत नसून अंतर्मनातील चांगुलपणा जागवण्यात आहे. आज दीपावलीचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. बाजारपेठांमध्ये खरेदीची गर्दी, महागड्या भेटवस्तू, आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई आणि फटाक्यांची आतषबाजी यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. सणाच्या आनंदाचे रूपांतर अनेकदा दिखाव्यात आणि स्पर्धेत होताना दिसते. कोणाची खरेदी मोठी, कोणाची सजावट आकर्षक आणि कोणाची दिवाळी अधिक भव्य, यामध्ये सामान्य माणूसही नकळत अडकत चालला आहे. परंतु, सणाचा आनंद हा खर्चाच्या प्रमाणावर नव्हे, तर तो वाटण्याच्या वृत्तीवर अवलंबून असतो. दिवाळीच्या झगमगाटात समाजातील वंचित, गरीब, कष्टकरी आणि गरजू घटकांचे वास्तव विसरता कामा नये. एकीकडे मोठमोठ्या इमारती रोषणाईने उजळत असताना दुसरीकडे अनेक कुटुंबांच्या घरात दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत असते. शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत असतो, कामगार आपल्या कष्टाचे योग्य मोल मिळवण्यासाठी संघर्ष करत असतो, तर अनेक कुटुंबे महागाईच्या ओझ्याखाली दबलेली असतात. अशा परिस्थितीत आपल्या आनंदात दुसऱ्यांचाही सहभाग असणे, हीच दीपावलीची खरी शिकवण आहे.

स्थानिक कुंभारांनी घडवलेल्या पणत्या खरेदी करणे, लघुउद्योजकांकडून वस्तू घेणे, महिला बचतगटांच्या उत्पादनांना प्राधान्य देणे आणि स्थानिक व्यापाऱ्यांना प्रोत्साहन देणे, यातून दीपावलीचा आनंद समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचू शकतो. आपल्या छोट्याशा खरेदीमुळे एखाद्या कारागिराच्या घरात आनंदाचा दिवा पेटू शकतो, ही जाणीव अधिक महत्त्वाची आहे.

पर्यावरणाचा विचार करणेही आज काळाची गरज बनली आहे. फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि प्राण्यांना होणारा त्रास याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. उत्सव साजरा करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; मात्र दुसऱ्यांच्या आरोग्याला आणि शांततेला बाधा पोहोचणार नाही, याची जबाबदारीही प्रत्येक नागरिकाची आहे. पर्यावरणपूरक दीपावली ही केवळ संकल्पना न राहता ती प्रत्येकाच्या आचरणात उतरली पाहिजे.

आज समाजाला सर्वाधिक गरज आहे ती माणुसकीच्या प्रकाशाची. जात, धर्म, भाषा, प्रांत आणि राजकीय विचारांच्या भिंतींमध्ये विभागल्या जाणाऱ्या समाजाला एकत्र आणण्याचे सामर्थ्य सणांमध्ये आहे. दीपावलीच्या निमित्ताने मनातील द्वेष, मत्सर, अहंकार आणि कटुता दूर करून परस्परांमध्ये प्रेम, विश्वास आणि बंधुभाव निर्माण करण्याचा संकल्प केला पाहिजे.

दीपावलीचा दिवा आपल्या घरात लावतानाच एखाद्या गरजूच्या आयुष्यातही आशेचा दिवा पेटवता आला पाहिजे. एखाद्या निराधाराला मदतीचा हात, एखाद्या गरजू विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य, एखाद्या वृद्धाला प्रेमाचे दोन शब्द आणि एखाद्या दुःखी व्यक्तीला आधार देता आला, तर त्यापेक्षा मोठी दिवाळी कोणती? आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या जीवनात माणूस भौतिक सुखांच्या मागे धावत असताना मानसिक समाधान आणि सामाजिक बांधिलकी यांपासून दूर जात आहे. अशा वेळी दीपावली आपल्याला थांबून आत्मपरीक्षण करण्याची संधी देते. आपल्या जीवनातील अंधार कोणता आहे आणि तो दूर करण्यासाठी आपण कोणता दिवा लावणार आहोत, याचा विचार करण्याची प्रेरणा देते.

शेवटी, दीपावली ही केवळ चार भिंतींना उजळवणारी रोषणाई नसून संपूर्ण समाजाला प्रकाशमान करणारी विचारधारा आहे. घरातील दिव्यांपेक्षा मनातील दिवे अधिक तेजस्वी झाले, संपत्तीपेक्षा समाधान मोठे वाटले, दिखाव्यापेक्षा माणुसकीला महत्त्व मिळाले आणि स्वतःच्या आनंदाबरोबर दुसऱ्यांच्या चेहऱ्यावरही हास्य फुलले, तरच दीपावलीचा खरा उत्सव साजरा झाला असे म्हणता येईल.

चला, यंदाच्या दीपावलीत केवळ घर नव्हे, तर मनेही उजळवूया! अंधाराला दोष देण्यापेक्षा एक दिवा आपणही लावूया. कारण खऱ्या अर्थाने प्रकाशमान समाजाची निर्मिती प्रत्येकाच्या मनातील माणुसकीच्या ज्योतीतूनच होणार आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

बाहेर १९९ रुपयांचा बोर्ड, दुकानात मात्र २५० रुपये!

- दिवाळीच्या खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांची दिशाभूल?

बारामती (आरंभ पर्व) : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर बारामती शहरातील भिगवण चौक परिसरात कपड्यांच्या दुकानांबाहेर लावण्यात येणाऱ्या आकर्षक जाहिरात फलकांमुळे ग्राहकांमध्ये संभ्रम आणि नाराजी व्यक्त होत आहे. दुकानाच्या बाहेरील बाजूस मोठ्या अक्षरांत 'फक्त १९९ रुपयांत ड्रेस' अशी जाहिरात केली जाते; मात्र ग्राहक दुकानात खरेदीसाठी गेल्यानंतर त्याच ड्रेससाठी २५० रुपयांचा दर दर्शविणारा फलक पाहायला मिळत असल्याचे चित्र समोर येत आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी महिला, तरुणी आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने बाजारपेठेत येत असतात. स्वस्त दरातील जाहिरात पाहून ग्राहक दुकानात प्रवेश करतात; मात्र प्रत्यक्ष खरेदीच्या वेळी वेगळी किंमत समोर आल्याने ग्राहकांची निराशा होत आहे. बाहेरील जाहिरात आणि दुकानातील प्रत्यक्ष विक्रीदर यामध्ये तफावत असल्यास ती ग्राहकांची दिशाभूल ठरू शकते, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी जाहिराती करणे हा व्यापाऱ्यांचा अधिकार असला, तरी जाहिरातीमध्ये नमूद केलेली किंमत आणि प्रत्यक्ष आकारली जाणारी किंमत यामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या जाहिरात फलकांची संबंधित ग्राहक संरक्षण यंत्रणेने दखल घ्यावी, अशी मागणी ग्राहकांकडून होत आहे. दिवाळीच्या सणात ग्राहकांनी खरेदी करताना जाहिरातीतील दर आणि प्रत्यक्ष बिलावरील दर तपासावेत, तसेच अशा प्रकारच्या तफावतीबाबत संबंधित दुकानदारांकडे स्पष्टीकरण मागावे, असे आवाहनही करण्यात येत आहे.

उरुळी कांचनमध्ये काकड आरतीच्या सुरांनी भक्तिमय वातावरण

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : नवरात्रीनंतर कोजागरी पौर्णिमेपासून ते दिवाळीनंतरच्या त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत महिनाभर उरुळी कांचन श्रीराम मंदिरातून काकडा आरतीचे सूर भल्या पहाटे कानी पडतात. वाढत्या शहरीकरणामुळे काळाच्या ओघात लुप्त होत चाललेल्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा टिकवून ठेवण्यासाठी मोजकीच ज्येष्ठ मंडळी, महिला आणि छोटी मुले का होईना काकड्याला हजेरी लावून ही परंपरा पुढे चालवत आहेत. काकडा आरतीसाठी जमलेल्या विठ्ठल भक्तांनी मंदिराचा गाभारा भरुन जातो. महिलांची संख्या लक्षणीय आहे. काकडा आरती मध्ये आंधळा, बहिरा, हरीची भजने, गौळणी म्हटल्या जातात. ज्येष्ठ महिलांचाही त्यात सहभाग असतो. तुपात भिजविलेल्या वातीची अर्थात काकड्याची ज्योतीची आरती ओवाळली जाते. सर्व देवदेवतांच्या आरत्या संपन्न होतात. पहाटे ४ वाजता सुरवात होऊन सकाळी ७ वाजता समाप्ती होते. उरुळी कांचन शहरातील काकडा आरतीची परंपरा कायम राखून आहेत. झपाट्याने शहरीकरण झालेल्या उरुळी कांचन मध्ये श्रीराम मंदिर मंदिरात मोठ्या उत्साहात काकड आरती संपन्न होताना दिसत आहे. उरुळी कांचनमधील समस्त ग्रामस्थ, श्री देवस्थान संस्था, श्रीराम जन्मोत्सव समिती, श्रीराम बचत गट आदीचे विशेष सहकार्य असते. पूर्व भागात सोरतापवाडी, शिंदवणे, कोरेगावमुळ, अष्टापुर, बिवरी, भवरापूर, वळती, पेठ, नायगाव, तरडे, हिंगणगाव याठिकाणी पहाटे वातावरण भक्तीमय होऊन जात आहे.

बारामती ते शिर्डी पायी पालखी सोहळा १२ नोव्हेंबरला

- साईच्छा सेवा ट्रस्टचा आरोग्य व व्यसनमुक्तीचा संदेश

बारामती (दै. आरंभ पर्व)

साईच्छा सेवा ट्रस्ट, बारामती यांच्या वतीने श्री साईबाबांच्या भक्तीचा जागर आणि आरोग्य, व्यसनमुक्ती व माणुसकीचा संदेश देणाऱ्या बारामती ते शिर्डी पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पालखीचे गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता भव्य प्रस्थान होणार आहे. "फक्त चालायचे नाही, तर साईंच्या चरणी स्वतःला अर्पण करायचे" या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या पायी पालखीमध्ये सहकुटुंब, सहपरिवार व मित्रपरिवारासह मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमातून आरोग्य अभियान, व्यसनमुक्ती अभियान आणि माणुसकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. साईनामाचा गजर करत शिर्डीच्या दिशेने पायी प्रवास करताना भक्तीबरोबरच आरोग्यदायी जीवनशैली आणि व्यसनमुक्त समाजाचा संकल्प करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या पालखी सोहळ्यासाठी कोणतीही देणगी, वर्गणी अथवा कॉन्ट्रिब्युशन घेतले जाणार नाही. सहभागी भाविकांसाठी सात्त्विक भोजन, पौष्टिक आहार, चहा-कॉफी व नाश्ता तसेच राहण्याची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र निवासाची व्यवस्था असून, शिर्डीहून परतीच्या प्रवासासाठी लक्झरी बसचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

पुणे ग्रँट सायकल टूर मार्गावरील कामांचा अतिरिक्त आयुक्तांकडून आढावा

फातिमानगर जंक्शनची दुरुस्ती, पदपथांची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे महानगरपालिकेच्या पुणे ग्रँट सायकल टूर (PGCT) प्रकल्पाच्या पॅकेज क्रमांक ४ अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांची अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे यांनी शुक्रवारी (दि. ६ नोव्हेंबर) सकाळी ८ वाजता प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून आढावा घेतला. यावेळी संबंधित कामे गुणवत्तापूर्ण आणि निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याबरोबरच प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

या पाहणीवेळी अधीक्षक अभियंता रोहिदास गव्हाणे, पुणे महानगरपालिकेच्या अभियंता विभागातील उपअभियंता व कनिष्ठ अभियंता, Pavetech Consultants चे प्रतिनिधी तसेच संबंधित कंत्राटदार उपस्थित होते.



फातिमानगर जंक्शन येथे रस्त्याच्या पृष्ठभागाची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती आणि रस्त्याची पातळी समतल करण्याच्या सूचना दिवटे यांनी दिल्या. वाहनचालकांना सुरक्षित व सुखकर प्रवास करता यावा, यासाठी रस्त्याच्या पृष्ठभागातील त्रुटी दूर करण्यावर त्यांनी भर दिला.

बी. टी. कवडे रोडवरील पाणीपुरवठा व ड्रेनेज विभागामार्फत खोदण्यात आलेल्या युटिलिटी ट्रेंचेसची सविस्तर नोंद तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले. संबंधित ठिकाणांची आणि कामांच्या सद्यस्थितीची माहिती संकलित करून संबंधित विभागांशी समन्वय साधण्यास सांगण्यात आले.

रेल्वे ब्रिज परिसरातील बी. टी. कवडे रोड तसेच PGCT मार्गावरील अन्य रस्त्यांवर अर्धवट राहिलेल्या पदपथांच्या कामांची पाहणी करून अपूर्ण कामांचे ठिकाण आणि तपशील निश्चित करावेत. उर्वरित पदपथांची कामे प्राधान्याने व तातडीने पूर्ण करावीत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

याशिवाय PGCT पॅकेजमधील संपूर्ण मार्गावर असलेल्या इतर युटिलिटी सेवांच्या कामांची सद्यस्थिती तपासण्याचे निर्देश देण्यात आले. संबंधित युटिलिटी विभाग व एजन्सींशी समन्वय साधून प्रलंबित कामांचा आढावा घ्यावा आणि रस्त्यांच्या विकासकामांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सर्व संबंधित विभागांनी स्थळ पाहणीदरम्यान दिलेल्या सूचनांनुसार तातडीने कार्यवाही करावी. कामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड अथवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. पुणे महानगरपालिकेचे अभियंता पथक आणि Pavetech Consultants यांनी नियमित पाठपुरावा करून प्रलंबित कामांचा अहवाल सादर करावा, असे निर्देश अतिरिक्त आयुक्तांनी दिले.

PGCT प्रकल्पांतर्गत रस्ते, पदपथ आणि विविध युटिलिटी सेवांची कामे समन्वयाने पूर्ण करून नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या पाहणीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

तीन भावांचा गोंधळ, पैशांचा मोह अन् विनोदाची अफलातून मेजवानी

- 'अफरातफरी' १३ नोव्हेंबरपासून झी५वर!
- मोहन आगाशे, संजय नार्वेकर आणि ओंकार भोजने यांच्या प्रमुख भूमिका
- मिलिंद झुंबर कवडे यांचे दिग्दर्शन



मुंबई (दै. आरंभ पर्व)

कौटुंबिक नातेसंबंध, आर्थिक अडचणी, पैशांचा मोह आणि त्यातून निर्माण होणारा गोंधळ यांची धमाल मनोरंजक मांडणी करणारा 'अफरातफरी' हा मराठी फॅमिली-कॉमेडी ड्रामा सिनेमा येत्या १३ नोव्हेंबर २०२६ रोजी मराठी झी५वर प्रदर्शित होणार आहे. मिलिंद झुंबर कवडे यांनी या सिनेमाचे दिग्दर्शन केले असून, मोहन आगाशे, संजय नार्वेकर, शशांक शेंडे आणि ओंकार भोजने यांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'अफरातफरी'ची कथा तीन भावांच्या आयुष्याभोवती फिरते. आर्थिक अडचणींमध्ये सापडलेल्या या तिघांच्या आयुष्यात वडिलांच्या निधनानंतर मोठे वळण येते. वडिलांच्या विम्याची रक्कम मिळण्याची शक्यता निर्माण होताच प्रत्येक भाऊ आपापल्या आर्थिक गरजा आणि महत्त्वाकांक्षांनुसार वेगवेगळ्या योजना आखू लागतो. मात्र, पैशांसाठी केलेले संशयास्पद प्रयत्न, गैरसमज आणि अनपेक्षित घटनांमुळे त्यांच्या आयुष्यात मोठी अफरातफर सुरू होते. यातून विनोदी प्रसंगांसोबतच कौटुंबिक नात्यांची कसोटी पाहणारे भावनिक क्षणही उलगडतात.

पैशांसाठी घेतलेले निर्णय माणसांच्या स्वभावातील वेगवेगळे पैलू कसे समोर आणतात आणि आर्थिक स्वार्थामुळे जवळच्या नात्यांमध्ये कशी गुंतागुंत निर्माण होते, याचे मनोरंजक चित्रण या सिनेमातून करण्यात आले आहे. प्रसंगनिष्ठ विनोद, अनपेक्षित वळणे आणि दमदार कलाकारांची फळी यामुळे 'अफरातफरी' प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची मेजवानी ठरण्याची अपेक्षा आहे. या सिनेमात मोहन आगाशे, संजय नार्वेकर, शशांक शेंडे, ओंकार भोजने, आसावरी जोशी, प्राजक्ता हणमघर, किरण माने, नेहा खान आणि हेमंत पाटील यांच्या भूमिका आहेत. अनुभवी कलाकार आणि नव्या पिढीतील लोकप्रिय कलाकारांचा संगम हे या सिनेमाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांनी या सिनेमाला मानवी स्वभावातील अनपेक्षित पैलू उलगडणारी मनोरंजक कथा असे संबोधले. पैशांची गरज माणसाला किती गुंतागुंतीच्या परिस्थितीत अडकवू शकते, हे या सिनेमातून पाहायला मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वसुबारस पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरी

तळेगाव दाभाडे (दै. आरंभ पर्व)

दिवाळी सणाचा प्रारंभ मानला जाणारा वसुबारस सण तळेगाव दाभाडे शहरात उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील श्री दत्तगुरू गोशाळेत पारंपरिक पद्धतीने गाय आणि वासराचे पूजन करण्यात आले. यावेळी सकाळी गायी व वासरांना स्वच्छ पाण्याने अंघोळ घालून त्यांच्या अंगावर पाण्याचे शिंतोडे मारण्यात आले. त्यानंतर त्यांच्या कपाळावर हळद-कुंकू, अक्षता लावून फुलांच्या माळांनी सजविण्यात आले. तसेच शिंगांना बेगड आणि डोक्याला भगव्या रंगाच्या पताका बांधून त्यांना सजविण्यात आले. यानंतर गायीला नैवेद्य दाखवून बळीराजांनी



कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. वसुबारसनिमित्त गोशाळा व मंदिर परिसर भक्तिमय झाला होता. यावेळी गोशाळेचे सदस्य आणि भाविक उपस्थित होते. भारतीय संस्कृतीत गोधनाला अनन्यसाधारण महत्त्व असून, वसुबारसच्या पूजनातून गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा जपली जाते.

एचडीएफसी बँकेत आता कॅपिटल गेन्स अकाऊंट्स स्कीमअंतर्गत ठेव सुविधा

भांडवली नफ्याची रक्कम तीन वर्षांपर्यंत ठेवता येणार

मुंबई (दै. आरंभ पर्व)

करदात्यांना भांडवली नफ्याच्या रकमेचे योग्य नियोजन करता यावे, तसेच करसवलतीचा लाभ घेता यावा, यासाठी एचडीएफसी बँकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. भारत सरकारकडून बँकेला कॅपिटल गेन्स अकाऊंट्स स्कीम (सीजीएएस) १९८८ अंतर्गत ठेवी स्वीकारण्याची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे आता करदात्यांना न वापरलेली भांडवली नफ्याची रक्कम बँकेत जास्तीत जास्त तीन वर्षांपर्यंत जमा ठेवता येणार असून, त्यावर व्याज मिळवण्याचीही संधी उपलब्ध होणार आहे. कॅपिटल गेन्स अकाऊंट्स स्कीमचा लाभ अशा करदात्यांना घेता येतो, ज्यांनी भांडवली मालमत्तेच्या विक्रीतून मिळालेल्या नफ्याची पुनर्गुंतवणूक आयकर विवरणपत्र दाखल करण्यापूर्वी केलेली नसते. अशा परिस्थितीत संबंधित आयकर कायद्यातील तरतुदींनुसार करसवलतीचा लाभ मिळवण्यासाठी न वापरलेली रक्कम सीजीएएस खात्यात जमा करता येते. यासाठी एचडीएफसी बँकेत बचत खाते किंवा मुदत ठेव खाते उघडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही सुविधा बँकेच्या भारतातील शहरी आणि निमशहरी शाखांमध्ये उपलब्ध असेल. ग्रामीण शाखांना या सुविधेतून वगळण्यात आले आहे. या खात्यांमध्ये जमा केलेल्या रकमेवर लागू नियम व अटींनुसार व्याज मिळणार आहे. एचडीएफसी बँकेच्या या सुविधेमध्ये ग्राहकांना एनईएफटी, आरटीजीएस, आयएमपीएस, यूपीआय आणि फंड ट्रान्सफरच्या माध्यमातून ऑनलाइन तसेच शाखेत जाऊन व्यवहार करता येणार आहेत. बचत खात्यात शून्य शिल्लक ठेवण्याची सुविधा असून, शून्य व्यवहार शुल्क आकारले जाणार आहे. बचत खाते आणि मुदत ठेवींवर दर तीन महिन्यांनी व्याज देण्यात येईल. खातेदारांना नेट बँकिंग आणि मोबाईल बँकिंगद्वारे केवळ खाते पाहण्याची सुविधा (व्ह्यू ओन्ली ॲक्सेस) मिळणार आहे.

अनावश्यक सत्कार, भाषणे आणि देणग्यांच्या घोषणांना फाटा

बदलाची सुरुवात स्वतःपासून करण्याचा निर्धार

- लग्नविधी, दशक्रियेत वेळेचा अपव्यय टाळण्याचा वारकरी मंडळाचा निर्णय

तळेगाव दाभाडे (दै. आरंभ पर्व)

लग्नसमारंभ आणि दशक्रिया विधीच्या वेळी अनावश्यक सत्कार, भाषणे व देणग्यांच्या घोषणांमुळे होणारा वेळेचा अपव्यय टाळून सर्व विधी नियोजित वेळेत पार पाडण्याचा निर्णय मावळ तालुका वारकरी संप्रदाय मंडळाने घेतला आहे. समाजातील या प्रथांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी मंडळाच्या कार्यकारिणीने स्वतःपासून सुरुवात करण्याचे एकमताने ठरविले.

मंडळाची विशेष बैठक हभप नाथा महाराज शेलार यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली. यावेळी लग्नसमारंभातील वेळेच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. विवाहाचे मुहूर्त ठरलेले असतानाही एखाद्या राजकीय, सामाजिक अथवा प्रतिष्ठित व्यक्तीच्या आगमनासाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे लग्नासाठी आलेल्या वऱ्हाडी मंडळींचा वेळ वाया जातो. त्याचा परिणाम त्यांच्या नोकरी, व्यवसाय आणि दैनंदिन कामकाजावरही होतो. विशेष म्हणजे, काही मान्यवर सत्कार स्वीकारल्यानंतर मंगलाष्टकांपूर्वीच निघून जातात. त्यामुळे विवाहविधी वेळेत पार पाडण्याच्या मूळ उद्देशालाच बाधा येते. यासाठी मंडळाच्या कार्यकारिणी सदस्यांनी स्वतःच्या घरातील विवाह समारंभांपासून वेळेचे नियोजन काटेकोरपणे पाळण्याचे ठरविले.



दशक्रिया विधीच्या वेळीही प्रवचनानंतर देणग्या स्वीकारणे आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी अनेक मान्यवरांना वारंवार व्यासपीठावर बोलावले जाते. त्यामुळे विधीला अनावश्यक विलंब होतो. देवस्थानांना देणग्या देण्याच्या परंपरेला विरोध नसून देणग्यांची नावे व रक्कम एकत्रितपणे वाचून दाखवावी, तसेच श्रद्धांजलीसाठी एक किंवा दोन प्रतिनिधींनाच संधी द्यावी, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. या बैठकीला हभप गोपीचंद महाराज कचरे, बजरंग घारे, ॲड. सागर शेटे, कार्याध्यक्ष संतोष कुंभार, अध्यक्ष हभप नंदकुमार भसे, उपाध्यक्ष दिलीप वावरे, नितीन आडिवळे, भरत येवले, शांताराम गायखे, बाळासाहेब राजिवडे, सुनील महाराज वरघडे, महादुबुवा नवघणे, युवराज देवकर, बळवंत येवले, शंकरराव खंगले, दीपक वारिंगे, काशिनाथ सातकर, गुलाब बधाले, शिवाजीराव बोडके, दशरथ शिंदे, दत्तात्रय ठाकर, सदाशिव पेटकर, नवनाथ थोरवे, नामदेव खांडभोर, साईनाथ राऊत, संजय बांदल, विजय गायखे, बाळासाहेब देशमुख, सुखदेव गवारी, रोहिदास जगदाळे, सोपान भसे, रवी ठाकर, गोविंद सावंत, निवृत्ती नखाते, दशरथ भोसले, दशरथ कदम आदी उपस्थित होते.

दरम्यान, आगामी कार्तिकी पायी वारीनिमित्त कोकण व मावळ विभागातून आळंदीला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी ३० नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२६ या कालावधीत सलग तीन दिवस अल्पोपहार, चहापाणी आणि दिंड्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. ०७ नोव्हेंबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची विद्यार्थ्यांना शपथ

अहिल्यानगर (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेऊन फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी विद्यार्थ्यांना फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ दिली. दिवाळी हा आनंदाचा आणि प्रकाशाचा सण आहे. मात्र, फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण तसेच पाण्याचा व इतर नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपव्यय टाळणे ही काळाची गरज आहे. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पाणी बचत करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे, असा संदेश यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी बोध घेऊन स्वतः फटाके न फोडण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांना व परिसरातील नागरिकांनाही पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी प्रोत्साहित करावे असे आवाहन पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी विद्यार्थांना केले. याप्रसंगी शास्त्र समन्वयक प्रा. अशोक गांगड, प्रा. राजेंद्र ढोणे, आतिष झावरे, योगेश मांडगे, देविदास आठरे, पोपट जगदाळे, नितीन ढोकळे, भाऊसाहेब हिंगडे, सचिन महानवर, बाबासाहेब जाधव, सुनील झावरे, रविंद्र मते, निलम खिलारी,सुमन वाळुंज, नारायण शेळके, निलेश पाचर्णे, संदीप महांडुळे, अतुल सैद, सोनल रोहकले, वैशाली गायखे, श्रीरंग धामणे, सुरेखा ठाणगे, प्रिया डव्हणे, कल्पना जाधव, मंगेश पोपळघट, अनिकेत बांगर, रामदास नरवडे, सिमा खोसे, सुवर्णा दिघे, संजना विश्वासराव, कृपा खरे, विष्णू भद्रे, श्वेता शिर्के, दिनेश वायदंडे, स्वप्नील कदम, वसंत वाघेरे, रईसाबी शेख तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. 'फटाके टाळूया, पर्यावरण वाचवूया आणि आनंदाची दिवाळी साजरी करूया!' असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले तर आभार दिनेश वायदंडे यांनी मानले.

पुण्यात श्रीधर पार्थसारथी यांचे निधन

पुणे (आरंभ पर्व) : कर्नाटक शास्त्रीय संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध मृदंगवादक श्रीधर पार्थसारथी यांचे शुक्रवारी पुण्यात निधन झाले. ते 56 वर्षांचे होते. बाणेर परिसरात आयोजित दिवाळी पहाट संगीत मैफलीत वादन करत असताना त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला. उपस्थितांनी तातडीने मदत केली आणि त्यांना खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत. श्रीधर पार्थसारथी यांनी अगदी लहान वयातच संगीताचे शिक्षण सुरू केले होते. वयाच्या 6 व्या वर्षापासून त्यांनी मृदंगवादनाचे धडे घेतले. प्रसिद्ध गुरू कारैकुडी आर. चंद्रमौळी यांच्याकडे त्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले. पुढे आपल्या कौशल्याच्या जोरावर त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात विशेष ओळख निर्माण केली. आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी डी. के. पट्टम्मळ, मदुराई जी. एस. मणी, डॉ. एम. बालमुरलीकृष्ण आणि रंगनाथ शर्मा यांसारख्या ज्येष्ठ कलाकारांना मृदंगाची साथ दिली. शास्त्रीय संगीतासोबतच इतर संगीतप्रकारांमध्येही त्यांनी विविध प्रयोग केले. शंकर महादेवन, संजीव अभ्यंकर, रतनमोहन शर्मा आणि नंदकिशोर मुळे यांच्यासोबत त्यांनी जुगलबंदी सादर केली होती. आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्यांच्या कामाची दखल घेण्यात आली होती. संगीत निर्माते बॉब बेल्डन यांच्या 'माइल्स फ्रॉम इंडिया' या अल्बममध्ये त्यांनी योगदान दिले होते. तालवादनातील प्रभुत्व आणि वेगवेगळ्या संगीतशैलींशी जुळवून घेण्याची क्षमता यामुळे त्यांचे नाव आदराने घेतले जात होते. श्रीधर यांच्या निधनाची बातमी समजल्यानंतर गायक शंकर महादेवन यांनी सोशल मीडियावर दुःख व्यक्त केले. जवळपास 40 वर्षांपूर्वी झालेल्या आपल्या पहिल्या कर्नाटक शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमात श्रीधर यांनी मृदंगाची साथ केली होती, अशी आठवण त्यांनी सांगितली. अनेक कार्यक्रम, गप्पा आणि आनंदाचे क्षण एकत्र घालवल्याचेही त्यांनी नमूद केले. संगीत सादर करत असतानाच श्रीधर यांनी जगाचा निरोप घेतल्याने संपूर्ण संगीतविश्वाला मोठा धक्का बसल्याचे त्यांनी म्हटले.

काव्यारंभ

दादा, यंदा तरी मला...

दादा, यंदा तरी मला
सांग, दिवाळी सणाला
आपुलकीने माहेरी
घ्यायला तू येशील का?||धृ||

नको मला साडी-चोळी,
नको दिवाळीचा फराळ;
भाऊबीजेला वेळ काढून
ओवाळून तू घेशील का?||१||

थोडासा वेळ काढून,
हसून-खेळून गप्पा मारून;
आस्थेने दोन शब्द बोलून
विचारपूस तू करशील का?||२||

लहानपणीचे रुसवे विसरून,
नात्यात आठवणींचा गोडवा;
दिवाळीच्या या मंगल सणात
पुन्हा एकदा आणशील का?||३||

असलो आम्ही सुखात,
अथवा असलो दुःखात;
तरी सांग, प्रत्येक दिवाळीला
आपले मानून येशील का?||४||

नको आम्हाला दिवाळीभेट,
भेटीपेक्षाही, दादा मला;
आपल्या रक्ताचे प्रेमळ नाते
सदा सांभाळून राखशील का?||५||

नको कसलाही अहंकार,
नको मनामध्ये दुरावा;
बहीण-भावाच्या या प्रेमाचा
ठेवा आयुष्यभर जपशील का?||६||

अलका भवारी - कोंढवळे
मो.: ९०११९४३८९०

“अफवांना बळी पडू नका, ओंकार ग्रुपवर विश्वास ठेवा!”

कर्मयोगी पुन्हा राज्यात अव्वल करण्याचा निर्धार : बाबुराव बोत्रे-पाटील

- कर्मयोगीच्या ३७ व्या गळीत हंगामाचा दिमाखात शुभारंभ
- शेतकऱ्यांना आठव्या दिवशी ऊस बिल, वाहतूकदारांचेही पेमेंट आठव्या दिवशीच!
- दिवाळीनिमित्त मोफत साखर आणि प्रतिटन १५० रुपयांचा अतिरिक्त हप्ता देण्याची घोषणा
- हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते बॉयलर अग्नीप्रदीपन सोहळा संपन्न



इंदापूर (दै. आरंभ पर्व)

“शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये, ओंकार ग्रुपवर विश्वास ठेवावा. शेतकऱ्यांचे हित हेच आमचे प्राधान्य असून, त्यांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही,” असा विश्वास ओंकार शुगर ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रे-पाटील यांनी व्यक्त केला. कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखाना सहयोगी ओंकार शुगर युनिट नं. ११ च्या ३७ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ व बॉयलर अग्नीप्रदीपन सोहळा गुरुवारी (दि. ५) राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष तथा माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील आणि ओंकार शुगर ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाला. यावेळी भाऊसाहेब व शोभा चौधरी या दाम्पत्याच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले.

या सोहळ्याच्या निमित्ताने बोत्रे-पाटील यांनी ऊस उत्पादक शेतकरी, सभासद आणि ऊस वाहतूकदारांसाठी महत्त्वपूर्ण घोषणा करत आर्थिक दिलासा दिला. मागील गळीत हंगामातील उसाला प्रतिटन ३,२०० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आले असून, दिवाळीच्या निमित्ताने प्रतिटन आणखी १५० रुपयांचा अतिरिक्त हप्ता जमा करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्याचबरोबर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिवाळीनिमित्त मोफत साखर देण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. यंदाच्या गळीत हंगामातील सर्वाधिक महत्त्वाची घोषणा म्हणजे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गाळप झाल्यानंतर आठव्या दिवशी त्यांच्या बँक खात्यात ऊस बिल जमा करण्यात येणार आहे. केवळ शेतकरीच नव्हे, तर ऊस वाहतूकदारांचे पेमेंटदेखील आठव्या दिवशीच जमा करण्याची ग्वाही बोत्रे-पाटील यांनी दिली. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी आणि वाहतूकदार या दोन्ही घटकांना दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ओंकार शुगर ग्रुपच्या कार्याचा आढावा घेताना बोत्रे-पाटील म्हणाले की, आज ओंकार शुगरच्या माध्यमातून चार राज्यांमध्ये ३५ हून अधिक साखर कारखान्यांचे संचलन केले जात आहे. शासनाकडून कोणतीही मदत न घेता शेतकऱ्यांच्या हितासाठी समूह काम करत आहे. त्यामुळे कारखान्याच्या कामकाजावर टीका करणाऱ्यांनी वस्तुस्थिती समजून घ्यावी. शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता ओंकार ग्रुपच्या कामावर विश्वास ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्ह्यात सर्वाधिक ऊसदर देण्याचा प्रयत्न!

यंदाच्या गळीत हंगामात जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक दर देण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे सांगताना बोत्रे-पाटील यांनी दुष्काळी परिस्थितीमुळे यंदा उसाचे उत्पादन आणि गाळप कमी होण्याची शक्यता व्यक्त केली. त्यामुळे कर्मयोगी कारखान्याचे सभासद आणि कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला ऊस कर्मयोगी कारखान्यालाच गाळपासाठी द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कर्मयोगी कारखान्याला पुन्हा एकदा राज्यात अव्वल स्थानावर नेण्याचा आमचा निर्धार आहे. शेतकरी, सभासद, कामगार आणि वाहतूकदार यांच्या सहकार्याने कारखान्याची प्रगती साधणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष तथा माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले. सहकार क्षेत्रातील त्यांचे योगदान आणि कारखाना चालविण्याच्या कार्यपद्धतीचा उल्लेख करत त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास ओंकार ग्रुपच्या संचालिका रेखाताई बोत्रे-पाटील, ओमराजे बोत्रे-पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी तेजस्विनी बर्गे, कारखान्याचे नूतन संचालक मंडळ, माजी संचालक, कार्यकारी संचालक रणजित तावरे, व्यवस्थापकीय संचालक विजय शिर्के यांच्यासह असंख्य ऊस उत्पादक शेतकरी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादीच्या माजी उपमहापौरांनी महिला कर्मचाऱ्याचा हात पकडला

पुणे महापालिका आवारातील प्रकार

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे महानगरपालिकेत एका महिला कर्मचाऱ्याशी गैरवर्तन झाल्याचा प्रकार समोर आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका नेत्यावर आणि माजी उपमहापौरांवर महिला कर्मचाऱ्याचा हात पकडून असभ्य वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर संबंधित महिलेने महापालिकेच्या विशाखा समितीकडे तक्रार केली आहे. तक्रारीची दखल घेत प्रशासनाने संबंधित माजी उपमहापौरांना महापालिकेच्या परिसरात प्रवेश करण्यास बंदी घातल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला पुणे महापालिकेच्या नगरसचिव विभागात कार्यरत आहे. गुरुवारी महापालिकेत स्थायी समितीची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी अनेक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत काही कर्मचारी बाहेर गेले होते. त्यावेळी संबंधित महिला कर्मचारीही बाहेर गेली होती. याच दरम्यान माजी उपमहापौरांनी महिलेचा हात पकडून तिच्याशी असभ्य भाषेत संवाद साधल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे महिला कर्मचारी घाबरली. तिने तेथून स्वतःची सुटका करून घेतली आणि घडलेला प्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिला.

तळेगाव नगरपरिषदेच्या विशेष सभेत १४५ कोटींच्या विकासकामांना मंजुरी

तळेगाव दाभाडे (दै. आरंभ पर्व)

तळेगाव नगरपरिषदेच्या नव्याने बांधलेल्या सभागृहात झालेल्या विशेष सभेत १४५ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांना मंजुरी देण्यात आली, तर नगरपरिषदेचे कर्मचारी व ठेकेदारी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिवाळी अनुदान देण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.



नगरपरिषदेची विशेष सर्वसाधारण सभा उपनगराध्यक्ष गणेश काकडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत एकूण ६६ विषयांवर चर्चा झाली. काही विषयांवर वादळी चर्चाही झाली. या चर्चेदरम्यान प्रशासनाला धारेवर धरण्यात आले, तर पाणीप्रश्नावर काही नगरसेवकांमध्ये हमरीतुमरी देखील झाली. या सभेत विरोधी पक्षनेते संतोष भेगडे, भाजपचे गटनेते इंद्रकुमार ओसवाल, राष्ट्रवादीच्या गटनेत्या हेमलता खळदे, बांधकाम समिती सभापती सुदाम शेळके, आरोग्य समिती सभापती निखिल भगत, नियोजन विकास समिती सभापती दीपक भेगडे, महिला व बालकल्याण समिती सभापती शैलेजा काळोखे, उपसभापती शोभा परदेशी, नगरसेवक सागर बोडके, चिराग खांडगे, विनोद भेगडे, सिद्धार्थ दाभाडे, शिवाजी आगळे, सूरज सातकर, अमर मुलानी, नगरसेविका सुरेखा भेगडे, संगीता खळदे, आशा भेगडे, सोनाली दरेकर, सिया चिमटे, कमल टकले, अनिता पवार, ऋतुजा भगत, स्नेहा खांडगे, अश्विनी शेळके, मनीषा म्हाळसकर, मुख्याधिकारी गिरीश दापकेकर, उपमुख्याधिकारी सुप्रिया शिंदे, स्नेहा पाटील तसेच सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या सभेत नगरपरिषदेच्या कला व वाणिज्य शाखेतील शिक्षकांचे वेतन, कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान, अभ्यासिकेतील कंत्राटी समन्वयकांचे वेतन, मालमत्ता कराची बिले वाटपासाठी बचत गटाची नेमणूक, चतुर्थ वार्षिक कर भांडवली मूल्यांकनावर करण्याची तरतूद, याशिवाय शहरातील रस्ते, गटार बांधकाम, सार्वजनिक शौचालय, समाजमंदिर उभारणी, भाजी मंडई उभारणी तसेच पाणीपुरवठा विभागातील महत्त्वाच्या विषयांना मंजुरी देण्यात आली.

विरोधी पक्षनेते संतोष भेगडे यांचे विषय सभेच्या अजेंड्यावर न घेतल्याने, तसेच सभागृहाच्या उद्घाटन कार्यक्रमावेळी नगरसेवकांना विश्वासात न घेतल्याने नगरसेवक सागर बोडके यांच्यासह काही नगरसेवकांनी कडक शब्दांत नाराजी व्यक्त केली.

गांधीनगर वसाहतीतील नागरिकांची वाट बिकट

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

पिंपरी शहरातील गांधीनगर वसाहतीमध्ये दोन महिन्यांपुर्वी अंतर्गत रस्ते जलवाहिनी ड्रेनिजची पाईप लाईन नवीन बसवली होती. परंतु खोदकामे करून ते अद्याप सिमेंट काँक्रिटीकरण केले नसल्याने नागरिकांना रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरातील अंतर्गत रस्त्यांवर पाण्याची डबकी, खड्डे आणि असमतोल पृष्ठभागामुळे नागरिकांची ये-जा त्रासदायक बनली आहे. नळाद्वारे सुटणारे पाणी रस्त्यावर साचल्यास पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालणेही कठीण होते. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. गांधीनगर वसाहतीमध्ये अनेक नागरिक दररोज कामानिमित्त बाहेर पडतात. कामगार,विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दुचाकीस्वारांना खराब रस्त्यांवरून प्रवास करताना विशेष काळजी घ्यावी लागते. रस्त्यांवर चिखल किंवा खड्डे असल्यास घसरून पडण्याचा धोका निर्माण होतो. तसेच वाहनचालकांनाही वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे. गांधीनगर वसाहतीमधील विविध नागरी सुविधांसाठी खोदकाम झाल्यानंतर रस्त्यांची योग्य प्रकारे दुरुस्ती न झाल्यास नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. काही ठिकाणी रस्त्यांची कामे अपूर्ण राहिल्याने ये-जा करताना अडथळे निर्माण होत असल्याची समस्या आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्यांची सद्यस्थिती तपासावी आणि आवश्यक त्या ठिकाणी तातडीने दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



रस्त्यांची दुरवस्था, नागरिकांना त्रास

गांधीनगर वसाहतीतील रस्ते सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. नागरिकांना दररोज होणारा त्रास लक्षात घेऊन प्रशासनाने केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता टिकाऊ स्वरूपाची दुरुस्ती करावी. रस्त्यांची पाहणी करून आवश्यक ठिकाणी खड्डे बुजविणे, चिखलाची समस्या दूर करणे आणि खोदकामानंतर रस्ते पूर्ववत करणे, या उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी होत आहे. नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाचा प्रश्न लक्षात घेऊन महापालिका प्रशासन यावर कधी कार्यवाही करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मराठी साहित्याचा श्वास

पुणे (दै. आरंभ पर्व)

प्रकाशाचा आणि आनंदाचा सण म्हणजे दिवाळी.या काळात उत्साह व मंगलमय वातावरण आणि जोडीला खमंग फराळ व नवनवे कपडे यांनी कुटुंबातील वातावरण चैतन्यमय असते. नातेवाईक,मित्र परिवार,भेटीगाठी हा दिवाळ सणाचा अविभाज्य भाग असतो.दिवाळी च्या फराळा बरोबरच मराठी संस्कृतीचा अविभाज्य भाग म्हणजे दिवाळी अंक.मनोरंजन मासिकाचे संपादक काशिनाथ रघुनाथ आजगावकर उर्फ का.र.मित्र यांनी १९०९ मध्ये पहिला दिवाळी अंक काढला.आज महाराष्ट्रात जवळपास ६५० ते ७०० चे आसपास विविध दिवाळी अंक प्रकाशित होत असतात. काही संपादक ठराविक विषय घेवून तर अनेक संपादक विविध विषयावर दिवाळी अंक प्रसिद्ध करत असतात.यातून वैचारिक देवाणघेवाण होत असते.संपादक हे दिवाळी अंक हे साहित्यिक बौद्धिक शब्द फराळ वाचकांपर्यंत पोहचवत असतात.वाचक सुद्धा दिवाळीला आतुरतेने वाट पाहत असतात.व्हॉटसअप,फेसबुक, इन्स्टाग्राम आदी सोशल मीडियाचा विळखा बसलेला असतानाही मराठी साहित्याचा श्वास ठरलेला दिवाळी अंक वाचणारा वाचक आहे हे वाढत्या दिवाळी अंकातून स्पष्ट होते. प्रत्येकाने दिवाळी अंक रुपी बौद्धिक शब्द फराळाचा आस्वाद घेतलाच पाहिजे.तसेच किमान एक दिवाळी अंक आपल्या जवळच्या आप्तेष्टांना भेट दिल्यास वाचन संस्कृती अधिक दृढ होईल. चला दिवाळी अंकाचे स्वागत करुया!



• शशिकांत जाधव, पुणे
संवाद-९६५७७५२६६५

दिवाळीच्या सणानिमित्त एसटी बस सज्ज

मराठवाडा, विदर्भ खानदेशातील प्रवाशांसाठी विशेष बससेवा

एच.ए. मैदानावर तात्पुरत्या बसस्थानकाची व्यवस्था



पिंपरी (दै. आरंभ पर्व)

दिवाळीच्या सणानिमित्त गावी जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पिंपरी चिंचवड वल्लभनगर आगाराने विशेष नियोजन केले आहे. दिवाळीच्या सुट्यांमध्ये प्रवाशांची गैरसोय होऊ नये, तसेच प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास करता यावा, यासाठी वल्लभनगर बसस्थानकातून सुमारे २०० ते २५० जादा एसटी बसेस सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील विविध गावांसाठी या विशेष बसेस धावणार आहेत. दिवाळी सणासाठी शाळा, महाविद्यालयांना सुट्या लागल्यानंतर तसेच खासगी कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांना सुट्या मिळाल्यानंतर मोठ्या संख्येने नागरिक आपल्या मूळ गावी जाण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे पिंपरी-चिंचवड परिसरातून बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. ही गर्दी लक्षात घेऊन वल्लभनगर आगाराने अतिरिक्त बससेवेचे नियोजन केले आहे. प्रवाशांची गर्दी नियंत्रित करण्यासाठी पिंपरीतील एच.ए. मैदानावर प्रशस्त जागेत तात्पुरत्या बसस्थानकाची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणाहून जादा बसेसचे नियोजन करून प्रवाशांना त्यांच्या गावी जाण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे मुख्य बसस्थानकावरील गर्दीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. विशेषतः मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोली तसेच विदर्भ आणि खानदेशातील विविध मार्गांवर प्रवाशांच्या मागणीनुसार जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.

प्रवाशांना बसची माहिती, वेळापत्रक आणि उपलब्धतेबाबत आगाराकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

गावी जाण्यासाठी अतिरिक्त बसेसची व्यवस्था केल्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. दिवाळीच्या काळात खासगी वाहनांचे भाडे वाढते. अशा परिस्थितीत एसटीची जादा सेवा सर्वसामान्य प्रवाशांसाठी फायदेशीर ठरणार आहे. बसस्थानकावर योग्य नियोजन, स्वच्छता आणि वेळेवर बस उपलब्ध करून द्याव्यात.

- भीमराव कांबळे, प्रवासी

दिवाळीच्या काळात कुटुंबासह गावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढते. त्यामुळे जादा बसेसची व्यवस्था करणे आवश्यक आहे. एसटी प्रशासनाने केलेल्या या नियोजनामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीचा होईल. मात्र, गर्दीच्या काळात बस वेळेवर सोडण्याबरोबरच ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी विशेष सुविधा असाव्यात.

- भगवान चाबुकस्वार, प्रवासी

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सोयीसाठी वल्लभनगर आगाराकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन सुमारे २०० ते २५० जादा बसेस उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील विविध मार्गांवर प्रवाशांच्या मागणीनुसार रात्री टप्प्याटप्प्याने बसेस सोडण्यात येत आहे. एच.ए. मैदानावर तात्पुरत्या बसस्थानकाची व्यवस्था करण्यात आली असून प्रवाशांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जाते.

- वैशाली कांबळे, बसस्थानक प्रमुख वल्लभनगर आगार

थोडक्यात पण महत्वाचे



आदिवासी-कातकरी वस्त्यांमध्ये दिवाळीचा आनंद

पुणे (आरंभ पर्व) : दिवाळीचा आनंद समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने भोर तालुक्यातील अतिदुर्गम अशा किल्ले रायरेश्वर परिसरातील टिटेघर, नाझरे व माकोशी येथील आदिवासी-कातकरी वस्त्यांमध्ये पुणे शहरातील गणेशोत्सव मंडळांच्या वतीने दिवाळी साजरी करण्यात आली. या उपक्रमांतर्गत ५१ आदिवासी कुटुंबांना दिवाळी फराळ व आकाशकंदील भेट देण्यात आले. तसेच शैक्षणिक मदतीचा भाग म्हणून लहान विद्यार्थ्यांसाठी पाच सायकलींचे वाटप करण्यात आले. दिवाळी फराळ व सायकलींची भेट मिळाल्याने वस्तीवरील लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला होता. हा सामाजिक उपक्रम जय गणेश व्यासपीठ, पुणे शहर यांच्या अंतर्गत नवज्योत मित्र मंडळ, येरवडा; वीर शिवराज मंडळ, गुरुवार पेठ; संजीवनी मित्र मंडळ, सहकारनगर आणि साईनाथ मंडळ ट्रस्ट, बुधवार पेठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. दुर्गम भागातील कातकरी विद्यार्थ्यांपर्यंत सायकली पोहोचविण्यासाठी सागर गांधी व पीयूष शहा यांनी विशेष योगदान दिले. कार्यक्रमाचे आयोजन अमित जाधव, किरण सोनीवाल, प्रसाद दिवटे, निलेश कोंढापूरे, चैतन्य सिन्नरकर व अक्षय पानसरे यांनी केले होते. दिवाळीचा सण केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू घटकांसोबत आनंद वाटून साजरा करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. नाझरे वस्ती वरील महिला अध्यक्षा मंगला वाघमारे यांनी पुण्यातील गणेशोत्सव कार्यकर्त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करत आभार मानले आज तुमच्या मुळे आमची दिवाळी खऱ्या अर्थाने साजरी होणार आहे.

"आम्ही भारताचे लोक" चळवळीतर्फे 'आई' विषयावर भव्य काव्यस्पर्धा

दौंड (आरंभ पर्व) : "आम्ही भारताचे लोक" आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीच्या वतीने स्मृतीशेष कमलबाई बळीराम सोनवणे यांच्या स्मृतीदिनानिमित्त (मृत्यू दिनांक: १०-११-२०२१) एका भव्य राज्यस्तरीय ऑनलाइन काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा मुख्य विषय "आई" हा असून ही स्पर्धा सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी पूर्णपणे निःशुल्क आहे. स्पर्धेत सहभागी होणारी कविता स्वरचित असावी; AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) च्या मदतीने तयार केलेली कविता स्वीकारली जाणार नाही. स्पर्धेतून प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक काढले जाणार असून स्मृतीशेष कमलबाई बळीराम सोनवणे यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव आयु. अंकुश बळीराम सोनवणे यांच्यातर्फे विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. तसेच निवडक उत्कृष्ट ५० कवितांचा एक प्रतिनिधिक काव्यसंग्रह "आम्ही भारताचे लोक" या प्रकाशन संस्थेकडून प्रकाशित केला जाणार आहे. कविता ऑनलाईन व्हाट्सॲपवर पाठवताना मेसेजमध्ये "स्पर्धेसाठी" असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक असून कविता पाठवण्याची अंतिम मुदत १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत आहे. या उपक्रमाचे आयोजन आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने करण्यात आल्याची माहिती चळवळीचे मुख्य समन्वयक संदेश कर्डक यांनी दिली. अधिक माहिती व कविता पाठवण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अविनाश मनवर (9699500275), सुनंदा साखळे (9820276312), वैशाली ढेठे (7709912597) यांच्याशी संपर्क साधता येईल. तसेच स्पर्धेकरिता रिता रामटेके (7841856636), स्वाती चव्हाण (7066375005) आणि अंकुश सोनवणे (9503446938) संघशिल भद्रे (9881127003) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

सहा लाखांची रोकड लुटली; सहजपूर हद्दीतील घट

यवत (दै. आरंभ पर्व)

इलेक्ट्रिकल दुकानांचे कलेक्शन घेऊन पुण्याकडे निघालेल्या कर्मचाऱ्याच्या 'डोळ्यात मिरची पूड टाकून तब्बल 5 लाख 95 हजार 600 रुपयांची रोकड असलेली सॅक दुचाकीवरून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी पळवून नेल्याची घटना घडली. पुणे-सोलापूर महामार्गावरील सहजपूर (ता. दौंड) ग्रामपंचायत हद्दीतील संजीवनी हॉटेलसमोर गुरुवारी (ता. 05) सायंकाळी पाऊणे सात वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी पवन अशोक पाटील (वय-24, रा. शिवणे, ता. हवेली) यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात तीन इसमांवर यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पवन हे पुण्यातील बुधवार पेठेतील पारस इलेक्ट्रिक दुकानात गेल्या पाच वर्षांपासून नोकरीस आहेत. गुरुवारी ते मालकाच्या ज्युपिटर दुचाकीवरून विविध इलेक्ट्रिकल दुकानांचे पैसे जमा करण्यासाठी निघाले होते. यावेळी त्यांनी हडपसर येथील रॉयल इलेक्ट्रिक दुकानातून 35 हजार 600 रुपये, केडगाव येथील एच.डी. इलेक्ट्रिकल दुकानातून 1 लाख 60 हजार रुपये, यवत येथील माऊली इलेक्ट्रिकल दुकानातून 2 लाख रुपये आणि यवत येथील भुलेश्वर मार्केटमधील संगीत इलेक्ट्रिकल दुकानातून 2 लाख रुपये असे एकूण 5 लाख 95 हजार 600 रुपये जमा केले होते. ही रोकड त्यांनी सॅकमध्ये ठेवून दुचाकीच्या सीटखालील डिकीत ठेवली होती.

वाहन सुरक्षेच्या ६० वर्षांच्या प्रवासानंतर सायबर सुरक्षेत झेप!

सीआयआरटीची सुरक्षित व सायबर सुरक्षित वाहतुकीकडे भारताची वाटचाल



पिंपरी (दै. आरंभ पर्व)

वाहन चाचणी, प्रमाणन, होमोलोगेशन आणि वाहतूक क्षेत्रातील क्षमता विकासासाठी कार्यरत असलेली भारतातील शिखर संस्था, केंद्रीय रस्ते वाहतूक संस्था (सीआयआरटी) यांनी हीरक महोत्सवी वर्षाचा आराखडा सादर केला. सेवेची ५९ वर्षे पूर्ण करून ६० व्या वर्षात पदार्पण केलेल्या संस्थेने या प्रसंगी वाहन सुरक्षा, रस्ते सुरक्षा आणि — वाढत्या प्रमाणात कनेक्टेड वाहनांच्या सायबर सुरक्षेतील आपल्या विस्तारत्या भूमिकेची माहिती दिली. माध्यम प्रतिनिधींना सीआयआरटीच्या नव्याने स्थापन झालेल्या ऑटोमोटिव्ह सायबर सुरक्षा पेनिट्रेशन टेस्टिंग प्रयोगशाळेची मार्गदर्शित भेटही घडविण्यात आली. याप्रसंगी डॉ. देवेंद्र सिंह, संचालक, सीआयआरटी, श्री शेखर ढोले, प्रमुख, तांत्रिक सचिवालय, फारुख मखदूम, प्रमुख, ऑटोमोटिव्ह सायबर सुरक्षा व व्यवस्थापन विकास केंद्र, डॉ. मंगेश पाठक, प्रमुख, सुरक्षा व होमोलोगेशन, संजय साळुंखे, प्रमुख, ऑटोमोटिव्ह चाचणी विभाग, उमेश सूर्यवंशी, प्रमुख, संशोधन व सल्लागार सेवा, शीबा राणी, शास्त्रज्ञ 'डी' व प्रमुख, प्रशिक्षण, प्रकाश दहिया, प्रशांत काकडे, संकेत धनावे उपस्थित होते.

भारत सरकारचे रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय आणि असोसिएशन ऑफ स्टेट रोड ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग्ज यांच्या संयुक्त पुढाकाराने १९६७ मध्ये सीआयआरटीची स्थापना झाली. देशभरातील राज्य परिवहन उपक्रमांसाठी चाचणी व क्षमता विकास हे संस्थेचे मूळ उद्दिष्ट होते. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हीरक महोत्सवी सोहळ्याचे औपचारिक उद्घाटन आणि महोत्सवी बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले.

गेली सहा दशके प्रयोगशाळांमधून चाचणी होऊन बाहेर पडलेल्या प्रत्येक सुरक्षित वाहनामागे आणि घटकामागे सीआयआरटी ठामपणे उभी आहे. भारत कनेक्टेड, सॉफ्टवेअर-डिफाइंड, इलेक्ट्रिक आणि स्वयंचलित वाहनांकडे वाटचाल करत असताना, वाहनाची सुरक्षा आता त्याच्या डिजिटल प्रणालींच्या सुरक्षिततेवरही अवलंबून आहे. हा वारसा जपत असतानाच भारतीय वाहतूक क्षेत्राच्या पुढील टप्प्यासाठी आवश्यक असलेली चाचणी, प्रमाणन आणि मनुष्यबळ क्षमता उभारणे, हाच आमच्या हीरक महोत्सवी वर्षाचा उद्देश आहे


- डॉ. देवेंद्र सिंह, संचालक, सीआयआरटी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून आयटीएलचे एमडी डॉ. दीपक मित्तल यांना विशेष स्नेहभोजनाचे निमंत्रण

लिक्टनस्टाइनच्या क्राउन प्रिन्स यांच्या सन्मानार्थ हैदराबाद हाऊसमध्ये आयोजन; भारतीय अभियांत्रिकीच्या जागतिक यशाचा गौरव

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेड (आयटीएल) या भारतीय ट्रॅक्टर उत्पादक कंपनीच्या जागतिक यशाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. दीपक मित्तल यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून लिक्टनस्टाइनचे क्राउन प्रिन्स महामहीम प्रिन्स अलोईस यांच्या सन्मानार्थ आयोजित विशेष स्नेहभोजनाचे प्रतिष्ठित निमंत्रण देण्यात आले. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी नवी दिल्लीतील हैदराबाद हाऊस येथे हा विशेष कार्यक्रम पार पडला.



तीन दशकांपूर्वी भारतीय अभियांत्रिकीला जागतिक स्तरावर नेण्याच्या महत्त्वाकांक्षेने सुरू झालेला प्रवास आज कंपनीला जगातील पहिल्या पाच ट्रॅक्टर उत्पादकांमध्ये घेऊन आला आहे, याचा विशेष अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले. भारताला जागतिक उत्पादन क्षेत्रातील एक आदरणीय शक्ती बनवण्यासाठी योगदान देणे हेच कंपनीचे ध्येय असल्याचे स्पष्ट करत, भारतीय उत्पादन क्षेत्राला आणखी मोठ्या उंचीवर नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. आयटीएलच्या तीन दशकांच्या प्रवासातील हा सन्मान केवळ एका कंपनीच्या यशाचा गौरव नसून भारतीय उत्पादन क्षमता, तंत्रज्ञान आणि उद्योजकीय दूरदृष्टीला मिळालेली जागतिक पातळीवरील प्रतिष्ठा मानली जात आहे.

भारत आणि लिक्टनस्टाइन यांच्यातील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करणे तसेच भारत-ईएफटीए व्यापार आणि आर्थिक भागीदारी कराराच्या (टीईपीए) माध्यमातून व्यापार, गुंतवणूक आणि औद्योगिक सहकार्याला चालना देणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. यावेळी युरोपातील आघाडीच्या उद्योगपतींच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाचीही उपस्थिती होती. भारत आणि युरोपमधील आर्थिक संबंधांना नवी दिशा देण्यासाठी प्रगत उत्पादन तंत्रज्ञान, औद्योगिक विकास, शाश्वत विकास आणि सीमापार गुंतवणूक या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली. या प्रतिष्ठित कार्यक्रमातील डॉ. मित्तल यांची उपस्थिती भारतीय खासगी उद्योग क्षेत्राचे वाढते जागतिक महत्त्व अधोरेखित करणारी ठरली. आयटीएलच्या जागतिक यशाचा प्रवास १९९६ मध्ये पंजाबमधील होशियारपूर येथून सुरू झाला. कंपनीने पहिल्या ट्रॅक्टरवर 'INTERNATIONAL' हे नाव कोरून भारतीय अभियांत्रिकीला जागतिक बाजारपेठेत प्रतिष्ठा मिळवून देण्याचा संकल्प केला होता. तीन दशकांच्या या प्रवासात कंपनीने मोठी झेप घेतली असून, आज १५० हून अधिक देशांमध्ये आपली उपस्थिती निर्माण केली आहे. गेल्या सलग आठ वर्षांपासून भारतातील पहिल्या क्रमांकाचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड म्हणून कंपनीने आपले स्थान कायम राखले आहे. तसेच १५ देशांमध्ये आघाडीचे स्थान मिळवत जगातील पाच प्रमुख ट्रॅक्टर ब्रँडमध्येही स्थान निर्माण केले आहे. यावेळी डॉ. दीपक मित्तल म्हणाले की, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा वाढता प्रभाव आणि प्रतिष्ठा दर्शवणाऱ्या महत्त्वपूर्ण प्रसंगाचा भाग होणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. लिक्टनस्टाइनच्या क्राउन प्रिन्स यांच्या सन्मानार्थ आयोजित स्नेहभोजनाचे निमंत्रण दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे त्यांनी आभार मानले. भारत-ईएफटीए कराराच्या पार्श्वभूमीवर झालेल्या चर्चेत प्रगत उत्पादन, औद्योगिक तंत्रज्ञान, शाश्वत विकास आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूक यांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांवर भर देण्यात आला. जागतिक ट्रॅक्टर उद्योगात भारताचे नेतृत्व करण्यामध्ये आयटीएलसारख्या भारतीय कंपन्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असून, भारतातून निर्यात होणाऱ्या प्रत्येक तीन ट्रॅक्टरपैकी एक ट्रॅक्टर सोनालिका किंवा सोलिस ब्रँडचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

उत्तर पुणे जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष वळसे पाटील

पुणे (दै. आरंभ पर्व)

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या उत्तर पुणे जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी आंबेगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष वळसे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परिषदेचे अध्यक्ष शिवराज काटकर यांनी उत्तर पुणे जिल्हा पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर केली. पुणे जिल्ह्याचा वाढता विस्तार आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने पुणे जिल्ह्याचे उत्तर आणि दक्षिण अशा दोन स्वतंत्र पत्रकार संघांमध्ये विभाजन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दोन्ही जिल्ह्यांच्या स्वतंत्र कार्यकारिणी स्थापन करण्यात येत आहेत. उत्तर पुणे जिल्हा पत्रकार संघामध्ये जुन्नर, आंबेगाव, मावळ, खेड, शिरूर आणि हवेली या सहा तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. पुणे महानगर आणि पिंपरी-चिंचवड पत्रकार संघांचे स्वतंत्र अस्तित्व कायम राहणार असून, हे दोन्ही संघ थेट अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेला जोडलेले असतील. संयुक्त जिल्हा संघाची बैठक नुकतीच मुळशी येथे पार पडली. नव्या कार्यकारिणीची मुदत एक वर्षाची असणार आहे. या कालावधीत दोन्ही जिल्हा संघांनी सदस्य नोंदणी पूर्ण करून मतदार यादी अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मावळ येथील ज्येष्ठ पत्रकार विजय सुराणा यांची थेट अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेवर परिषद प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



- शिवराज काटकर यांच्याकडून नवीन कार्यकारिणी जाहीर
- उत्तर पुण्यातील सहा तालुक्यांचा संघात समावेश

परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त शरद पाबळे, उपाध्यक्ष गणेश मोकाशी आणि मावळते अध्यक्ष सुनील लोणकर यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

उत्तर पुणे जिल्हा पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे :
अध्यक्ष : संतोष वळसे पाटील
उपाध्यक्ष : हनुमंत देवकर (चाकण)
उपाध्यक्ष : सचिन कांकरिया (जुन्नर)
सरचिटणीस : दत्ता भालेराव (खेड)
कोषाध्यक्ष : संजय बारहाते (शिरूर)
जिल्हा निवडणूक प्रमुख : रवी पाटील
जिल्हा कायदेशीर सल्लागार : संजय पाटील

काव्यारंभ

हरवलेलं बालपण

मोबाईल पायी बालपण हरवलेल्यांच्या
हातून मोबाईल काढून घे,
माती, मैदान, झाडे, पाण्यात
जरा मनसोक्त त्यांना खेळू दे!

दगड, वीट, माती, चिखलांनी
हातपाय जरा माखू दे,
नवनिर्मितीच्या आनंदातून
अभेद किल्ला बनवू दे!

हत्ती, घोडे, उंट, तलवार
घेऊन शत्रूशी जरा भिडू दे,
सह्याद्रीच्या रक्षणासाठी
शिवरायांचा मावळा बनून लढू दे!

शौर्य, धाडस, जिद्द, संघर्ष
त्यांच्या अंगी बाणू दे,
संकटाचा सामना करताना
देशभक्तीचे स्फुरण चढू दे...

मोबाईलमुळे हरवलेल्या
विचारांना नवी दिशा लाभू दे,
चिंतन, मनन, भविष्य घडवण्या
त्यांच्या हाती पुस्तके दे...

- विठ्ठल वळसे पाटील
पुणे - ८४८४ ०६६०४२

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

पोत्यात पुरुषाचे पाय!

सिमकार्डच्या कव्हरमुळे धागा सापडला, मित्राच्या घरी गेल्यानंतर बॉडी मिळाली



पिंपरी-चिंचवड (दै. आरंभ पर्व)

पिंपरी-चिंचवडमधील पिंपळे गुरव परिसरात रस्त्याच्या कडेला कचऱ्यात एका पोत्यामध्ये पुरुषाचे गुडघ्यापासून वेगळे केलेले दोन पाय आढळल्याने मोठी खळबळ उडाली होती. या धक्कादायक हत्याकांडाचा सांगवी पोलिसांनी अवघ्या काही तासांत उलगडा केला आहे. विष्णू तानाजी कुंभार असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव असून, अनिल खाडे असं मृत व्यक्तीचं नाव आहे.


रामकृष्ण मंगल कार्यालय ते काटेपुरम चौकादरम्यान रस्त्याच्या कडेला असलेल्या कचऱ्यात हा प्रकार उघडकीस आला. काल शुक्रवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या दरम्यान कृष्णा लोट आणि ओमकार काळे हे कचरा गोळा करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांना एका पोत्यावर रक्ताचे डाग दिसले. सुरुवातीला पोत्यात श्वानाचे पाय असल्याचा त्यांना संशय आला. मात्र, पोते उघडून पाहिले असता त्यामध्ये मानवी पाय असल्याचं समोर आलं. त्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच सांगवी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तपास सुरू केला असता ज्या पोत्यात मानवी पाय ठेवण्यात आले होते, त्यामध्ये सिमकार्डचे कव्हर आढळले. या कव्हरवरील मोबाईल क्रमांकाच्या आधारे पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. या क्रमांकाच्या माध्यमातून पोलिसांना मृत अनिल खाडे याच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचता आले. त्यानंतर पोलिसांचा तपास आरोपी विष्णू कुंभार याच्यापर्यंत पोहोचला. पोलिसांनी विष्णू कुंभार याच्या घरी धाव घेतली असता घराला कुलूप असल्याचं दिसून आलं. आरोपी घराला कुलूप लावून फरार झाला होता. पोलिसांनी कुलूप तोडून घरात प्रवेश केला असता आतून दुर्गंधी येत होती. घराची पाहणी केली असता अनिल खाडे याचा मृतदेह आढळून आला. त्यामुळे या संपूर्ण हत्याकांडाचा उलगडा झाला.

दारूच्या नशेत वाद; मित्रानेच केली मित्राची हत्या

पोलिसांच्या तपासानुसार, अनिल खाडे आणि विष्णू कुंभार हे दोघे मित्र होते. रात्री दोघांनी एकत्र दारू प्यायली होती. यावेळी त्यांच्यात वाद झाला. याच वादातून विष्णू कुंभार याने अनिल खाडे याच्या डोक्यात लोखंडी वस्तूने वार करून त्याला बेशुद्ध केले. त्यानंतर कोयत्याने गुडघ्यापासून दोन्ही पाय वेगळे केले. हत्येनंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपीने मृतदेहाचे विभक्त केलेले दोन्ही पाय पोत्यात भरले आणि रामकृष्ण मंगल कार्यालय ते काटेपुरम चौकादरम्यान रस्त्याच्या कडेला असलेल्या कचऱ्यात फेकून दिले.

सिमकार्डच्या कव्हरमुळे घटनेचा उलगडा

कचऱ्याच्या पोत्यात आढळलेल्या सिमकार्डच्या कव्हरमुळे पोलिसांना महत्त्वाचा पुरावा मिळाला. त्याच धाग्याच्या आधारे सांगवी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपी विष्णू तानाजी कुंभार याला अटक केली. पोलीस उपायुक्त संदीप आटोळे, सहायक पोलीस आयुक्त मनीषा कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सांगवी पोलिसांच्या पथकाने ही कामगिरी केली आहे.



अखेर 'बस पोर्ट'ला मुहूर्त! शिवाजीनगर बसस्थानकाचा होणार कायापालट

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाचे केंद्र असलेल्या शिवाजीनगर मध्यवर्ती बसस्थानकाच्या विकासाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या ठिकाणी अत्याधुनिक बस पोर्ट उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) आणि महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन (महामेट्रो) यांच्यात संयुक्त विकासाचा सामंजस्य करार बुधवारी करण्यात आला. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी 'महामेट्रो'ची प्रकल्प अंमलबजावणी प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. शिवाजीनगर बसस्थानकाचा विकास सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे एसटी बसस्थानक, मेट्रो स्थानक आणि रेल्वे स्थानक यांची एकात्मिक जोडणी होणार असून, प्रवाशांना एका ठिकाणाहून विविध सार्वजनिक वाहतूक सेवांचा लाभ घेता येणार आहे.

दीर-सासूला सशर्त जामीन, पण ही निर्दोष सुटका नाही

वैष्णवी हगवणे प्रकरणी हायकोर्टाने सुनावलं

मुंबई/पुणे (दै. आरंभ पर्व)

पुण्यातील विवाहिता वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात एक महत्त्वाची घडामोड घडली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणातील तीन आरोपी— दीर सुशील हगवणे, सासू लता हगवणे आणि निलेश चव्हाण—यांना सशर्त जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती मिलिंद एन. जाधव यांनी प्रत्येक अर्जदाराची भूमिका, उपलब्ध पुरावे आणि तपासाची प्रगती यांचा आढावा घेतल्यानंतर हा आदेश दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, जामीन मिळणे म्हणजे निर्दोष मुक्तता नव्हे. प्रत्येक आरोपीला २५ हजार रुपयांचा पर्सनल बाँड आणि तितक्याच रकमेची जामीनदार (सॉल्व्हेंट शुअरटी) सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, न्यायालयाच्या परवानगीशिवाय त्यांना महाराष्ट्र सोडून जाण्यास मनाई करण्यात आली आहे. पुढील सहा महिने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी त्यांना बावधन पोलीस ठाण्यात हजेरी लावण्यास सांगण्यात आले आहे. सरकारी पक्षाने



जामिनाला तीव्र विरोध करताना हुंडाबळीसाठी वैष्णवीचा छळ केल्याचा आरोप केला. लग्नामध्ये ५१ तोळे सोने आणि एक एसयूव्ही गाडी मिळाल्यानंतरही, जमीन खरेदीसाठी २ कोटी रुपयांची मागणी केल्याचा उल्लेख होता. मात्र, न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, सध्याच्या टप्प्यावर अर्जदारांचा जीव देण्यास प्रवृत्त करण्याच्या विशिष्ट कृतींशी थेट संबंध जोडणारा प्राथमिक पुरावा उपलब्ध नाही. जमीन खरेदी करण्यासाठी होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून पुण्यातील विवाहिता वैष्णवी हगवणे हिने १६ मे २०२५ रोजी आयुष्याची अखेर केली. या प्रकरणी तिचा पती शशांक राजेंद्र हगवणे, सासरा राजेंद्र तुकाराम हगवणे, सासू लता राजेंद्र हगवणे, नणंद करिश्मा राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील राजेंद्र हगवणे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

गेल्या वर्षी कोर्टाने नाकारलेला जामीन

'हुंडाबळी हा समाजाला लागलेला कलंक आहे. नऊ महिन्यांच्या बाळाची आई दबावाशिवाय टोकाचा निर्णय घेऊच शकत नाही. आरोपींवर कट कारस्थान रचणे, जीव देण्याला प्रवृत्त करणे, पुरावे नष्ट करणे आणि आरोपींना लपवण्यासारखे गंभीर आरोप आहेत. आरोपींना जामिनावर सोडल्यास साक्षीदारांवर दबाव येण्याची किंवा पुराव्यांशी छेडछाड होण्याची शक्यता आहे' अशी गंभीर निरीक्षणं नोंदवून गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस पुणे न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश के. पी. क्षीरसागर यांनी जामीन नाकारला होता.



दै. आरंभ पर्वला जाहिरात देऊन तर पहा..!

आपल्या व्यवसायाची भरारी, आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा **दैनिक आरंभ पर्व.**

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरणीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

आपल्या यशाची सुरुवात योग्य प्रसिद्धीपासून...!



आजच जाहिरात द्या आणि आपल्या व्यवसायाला द्या नवी ओळख..!

दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात, उद्याची यशोगाथा..!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार NEWS CHANNEL



दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!

आपणही बना आमच्या टीमचा भाग !



महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

आम्हाला हवे आहेत :

पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक.
पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.

कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.

आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.

कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

आमच्याशी जोडल्याने मिळेल :

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- निःपक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! **समाजाचा आवाज बना!**

आपली ओळख करा...
आपला आवाज बुलंद करा!

संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!